मराठा आंदोलनास आठवलेंचा पाठिंबा

फडणवीस यांच्यावरील टीका टाळावी असा जरांगेंना सल्ला

सातारा– मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आरपीआय आठवले गटाने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. महाबळेश्वर येथील राज्यस्तरीय विचारमंथन शिबिरात मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत एकमताने हा ठराव मंजूर झाला.

आठवले गटाच्या सक्षमीकरणासाठी महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय विचार मंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी उपस्थिती लावली. शिबिरात पक्षवाढीच्या अनुषंगाने मंत्री आठवले यांनी आरपीआयच्या राज्यातून आलेल्या पदाधिकाऱ्यांना काही सूचना केल्या आहे. तसेच, महायुतीमधून पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त आरपीआय पक्षाला महामंडळ आणि मंत्रिपदे मिळतील, असा ठरावही घेण्यात आला. दरम्यान, मराठा आरक्षणाबाबत आणि मनोज जरांगेंच्या आंदोलनाबाबत या विचारमंथन शिबिरात ठराव मंजूर झाला असल्याचे मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. मराठा समाजाला आरक्षण मिळाल पाहिजे हे आमची पहिल्यापासून भूमिका आहे. मात्र, मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे की सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या. सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय नको, अशी आमची भूमिका आहे. मनोज जरांगे यांनी एखादी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत घ्यावी, आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरील टीका टाळावी, असा सल्लाही जरांगे पाटील यांना आठवलेंकडून देण्यात आला आहे.

मंदिरे सरकारच्या नाही तर भक्तांच्या ताब्यात द्या

मिसाळ महाराज, मंदिर महासंघाचे मंदिर-न्यास जिल्हा अधिवेशन

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– मंदिर हे हिंदू धर्मियांचे आस्थेचे केंद्र आहे, पण मंदिरांचे सरकारीकरण झाल्यापासून जे ट्रस्टी सरकारी मंदिरात सरकारने नेमलेले असतात त्यांना मंदिराचे काही देणेघेणे नाही. मंदिरात दान केलेला पैसे दानाचा दुरुपयोग कसा होतो याचाही आपण अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे आपली मंदिरे ही सरकारच्या नाही तर भक्तांच्याच ताब्यात पाहिजेत, असे कृष्णकृपांकित विकासानंद महाराज मिसाळ यांनी स्पष्ट केले.

श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्ट एमआयडीसी. नवनागापूर, महाराष्ट्र मंदिर महासंघ, हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्ट येथे पार पडलेल्या अधिवेशनाचा शुभारंभ सनातन संस्थेचे धर्मप्रचारक नंदकुमार जाधव, कृष्णकृपांकित डॉ. विकासानंद महाराज मिसाळ, मंगल सेवा भक्त मंडळाचे विश्वेश्वर स्वामी महाराज, श्री रेणुकामाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट, माजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त दिलीप देशमुख, यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाला. त्यावेळी मिसाळ महाराज बोलत होते.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रम्ह डॉ. जयंत बाळाजी आठवले यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन मंदिर महासंघाचे संयोजक भरत शिंदे यांनी केले. स्वागत देवस्थानचे सचिव दत्तात्रय विटेकर यांनी केले. तर अधिवेशनाची प्रस्तावना हिंदु जनजागृती समितीचे अहिल्यानगर समन्वयक रामेश्वर भूकन यांनी मांडली.

मंदिरावर हल्ले होत आहेत, मंदिराच्या जागा बळकावल्या जात आहेत. तरी आपण जागृत होत नाही. जागृत होणे गरजेचे आहे. म्हणून प्रत्येक मंदिरात आरती होणे गरजेचे आहे. भगवंताच्या चरणी नतमस्तक होणे गरचेचे आहे. असे मार्गदर्शन पु. विश्वेश्वर स्वामी महाराज यांनी केले. ते अधिवेशनाच्या प्रथम सत्रात बोलत होते.

मंदिरांचे सरकारीकरण आणि त्या मंदिरांत भ्रष्टाचार, पैसे घेऊन व्ही.आय.पी. दर्शन, मंदिरांची भूमी बळकावणे यांसह वक्फ बोर्डाचे अतिक्रमण चालू आहे. यामुळे मंदिर रक्षणासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघ कार्यरत आहे. मंदिरांच्या समस्या सोडवतांनाच महासंघ मंदिरांचे संघटन करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी केले.

मंदिरांतून संस्कारवर्ग घेणे, धर्मशास्त्र समजावून सांगणे हे कार्य नियमित व्हायला हवे. हिंदु समाजाची जन्म हिंदु ते कर्म हिंदु पर्यंत वाटचाल होण्यासाठी मंदिर अधिवेशन हे प्रभावी माध्यम आहे. म्हणून मंदिरे ही धर्मशिक्षणाची केंद्रे बनायला हवी, असे आवाहन सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरू नंदकुमार जाधव यांनी केले.

निवृत्त सहाय्यक धर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख यांनी न्यास नोंदणी तसेच मंदिरांच्या अडचणीसंदर्भात मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात मंदिर विश्वस्तांना मंदिरांच्या जमिनीविषयी येणाऱ्या अडचणी याविषयी परिसंवाद झाला. समारोपीय सत्रात मंदिर महासंघाच्या कार्याची पुढील दिशा कशी असावी? याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. समारोपीय सत्रात हिंदू संघटक बापू ठाणगे व रामदास महाराज क्षीरसागर यांनी उपस्थितांना संबोधित केले.

सूत्रसंचालन कु. श्रुती शिरसाठ यांनी केले. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्हा मंदिर महासंघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या अधिवेशनाला राहुरी, श्रीगोंदा, आष्टी, अहिल्यानगर, नेवासा, पाथर्डी , संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, शेवगाव, कर्जत, शिरूर, राहाता, पारनेर येथील विविध मंदिरांचे ३०० हून अधिक विश्वस्त, प्रतिनिधी उपस्थित होते.

काँग्रेसने भूमिका स्पष्ट करावी– बावनकुळे

मराठा समाजाला फडणवीस यांनीच आरक्षण दिले

नागपूर– राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, पण कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी केले जाणार नाही. एका समाजातून आरक्षण काढून दुसऱ्याला देणे योग्य होणार नाही. मात्र याबाबत काँग्रेसने आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी असे आव्हान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आरक्षणाबाबत काँग्रेस नेत्यांची भूमिका नेहमीच गोंधळलेली आहे. राहुल गांधी म्हणतात, ओबीसी आरक्षण कायम ठेवा, जातीय जनगणना करा. पण महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते ओबीसी आरक्षण काढून मराठ्यांना देण्याची भाषा करतात. त्यामुळे काँग्रेसने मराठा आरक्षणाबाबत नक्की भूमिका काय? हे स्पष्ट करावे. अनेक मराठा नेते मुख्यमंत्री झाले. पण फडणवीस यांनीच मराठा समाजाला आरक्षण दिले असेही त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनाचा अधिकार सर्वांना आहे, मात्र गणेशोत्सवासारख्या महत्त्वाच्या सणात आंदोलन करणे योग्य नाही. चार दिवसांनी आंदोलन झाले असते तरी हरकत नव्हती असे सांगून बावनकुळे म्हणाले.२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार सरकारही त्याच भूमिकेत आहे की, आरक्षण ओबीसींच्या कोट्यातून न देता स्वतंत्र द्यावे, असे त्यांनी सांगितले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी खूप काम केले. त्यांच्यावर जातीवरून टीका करणे चुकीचे आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची मराठा आरक्षणाबाबत भूमिका काय? नाना पटोले यांनी ओबीसी आरक्षण कमी करण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला का? काँग्रेसने यावर ठराव घेतला का? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. काँग्रेसच्या सर्व नेत्यांना ओबीसी समाजाचे आरक्षण काढायचे आहे काय? ते दुसऱ्या समाजाला द्यायचा आहे काय? की मराठा समाजाला वेगळ आरक्षण दिले पाहिजे या बाबत कुठली भूमिका आहे हे स्पष्ट केले पाहिजे असे आव्हानच बावनकुळे यांनी दिले.

पान १ वरुन

जरांगेंचे आजपासून उपोषण

आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. माझ्या प्रकृतीची काळजी नाही, समाजाच्या वेदनांसमोर ते गौण आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झालेले मनोज जरांगे पाटील मुंबईत मराठा आरक्षणासाठी सुरू होणाऱ्या आमरण उपोषणापूर्वी शिवनेरी येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

रात्रभर न झोपता २२ तास प्रवास करून शिवनेरी किल्ल्याच्या दर्शनासाठी आलेल्या जरांगे पाटलांनी, पावसाळ्यात दुचाकीवरून मुंबईकडे निघालेल्या मराठा तरुणांची वेदना मांडली. त्यांच्या पाठीमागे खूप मोठ्या वेदना असून, ही बाब मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे असे आवाहन त्यांनी केले. न्यायालयाने जे सांगितले त्याप्रमाणे आम्हाला करावे लागेल. न्यायदेवतेने सांगितले परवानगी घ्या. त्यानंतर आझाद मैदानावर उपोषणाला केवळ एक दिवसाची परवानगी देणे म्हणजे मराठा समाजाचा जाणूनबुजून अपमान आहे. यातून काहीही साध्य होऊ नये असा सरकारचा उद्देश दिसतो. सरकारने मोठं मन दाखवून मराठ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत उपोषणाला कायमस्वरूपी परवानगी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. यातून समाजात नाराजीची लाट उसळली असून, याचा संदेश राज्यभर गेला आहे, असे जरांगे पाटील म्हणाले.

आंदोलन लोकशाहीच्या...

आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाच्या संघटनांनी साखळी उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे. याकडे लक्ष वेधले फडणवीस यांनी राज्य सरकार मराठा आणि ओबीसी समाजाच्या हिताचा विचार करणार असल्याचे सांगितले.

कुठल्याही समाजाला दुसऱ्या समाजासमोर आणण्याचा सरकारचा हेतू नाही. त्यामुळे कुणावर अन्याय करून कुणाला काही देण्याचा प्रश्न नाही. दोघांचेही प्रश्न आम्ही सोडवणार आहोत. ओबीसी समाजाने हे लक्षात ठेवावे की आम्ही त्यांच्यावर कुठेही अन्याय होऊ देणार नाही.आमचे सरकार असताना मराठा समाजाचे प्रश्न आम्ही सोडवले आहेत. ओबीसींच्या ३५० जाती आहेत. मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले असून ते न्यायालयात टिकलेले आहे. तरीही काही गोष्टी आम्ही समजावून घेऊ, असेही फडणवीस म्हणाले. मराठा समाजाचे जे जबाबदार नेते आहेत त्यांनी समाजाच्या हिताचा विचार करून मागणी केली पाहिजे. मराठा समाजाला राजकीय आरक्षण मिळणार नाही. मात्र, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाशी संबंधित मागण्यांचा विचार केला जाईल. मराठा समाजाचे आंदोलन राजकीय नाही. या आंदोलनाकडे आम्ही सामाजिक प्रश्नातून बघतो. काही राजकीय पक्ष आंदोलकांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. पण यातून त्यांचा फायदा होणार नाही तर नुकसानच होईल, असा टोला फडणवीस यांनी विरोधी पक्षाला नाव न घेता लगावला.

ओबीसी समाजही उपोषण...

बैठकीला राज्यभरातील महत्वाचे पदाधिकारी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने उपस्थित होते. यावेळी मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याच्या मागणीला तीव्र विरोध करण्यात आला. तसेच ओबीसी आंदोलनाची दिशाही ठरविण्यात आली. यावेळी बोलताना ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, उद्यापासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जनजागृती मोहिम राबवली जाईल आणि पत्रकार परिषद घेऊन ओबीसी समाजाची भूमिका मांडली जाणार आहे. त्यानंतर ३० ऑगस्ट २०२५ रोजी नागपूरातील संविधान चौकात साखळी उपोषण केले जाईल. इतर जिल्ह्यांमध्ये स्थानिक पदाधिकारी उपोषण करून सरकारचे लक्ष वेधणार आहेत. आम्ही १५ दिवसांत मुंबईकडे कूच करण्याची तयारी करत आहोत. यातून आम्ही सरकारचे लक्ष आमच्या मागण्यांकडे वेधू असं तायवाडे म्हणाले.

ओबीसी समाजाचे आरक्षण कमी करु नये

आम्हाला सरकारने हमी दिली आहे, त्यावर सरकारने ठाम रहावे. ओबीसी समाजाला जे आरक्षण दिले जात आहे त्याला धक्का लागू नये. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊन ओबीसी समाजाचे आरक्षण कमी करु नये. तसेच मराठा समाजाला ज्यांच्याकडे कोणतेही पुरावे नाहीत, त्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देऊ नयेत अशी मागणीही डॉ. बबनराव तायवाडे यांनी केली.

मुख्यमंत्र्यावर टीका करून...

१२४७.७९ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य समाजातील तरुणांना दिले गेले, याकडे लक्ष वेधून ना. विखे पाटील म्हणाले, जरांगे पाटील यांनी उपस्थित केलेले मुद्दे कायदेशीर बाबींशी निगडीत आहेत. यासाठीच शिंदे समिती गठीत करण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेटच्या संदर्भात महसूलमंत्री असताना अधिकाऱ्यांची टीम पाठवून गोळा केलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुरु आहे. दाखले देण्याची प्रक्रिया सुद्धा सुरु करण्यात आली आहे. मात्र अधिक गुंतागुंत होऊ नये म्हणून न्या. शिंदे समिती काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

आज आरक्षणाच्या प्रश्नावर महाविकास आघाडीचे नेते राजकीय भूमिकेतून बोलत आहेत. परंतु महाविकास आघाडी सरकारने आरक्षणाच्या बाबतीत कोणतेही गांभीर्य दाखवले नाही. उलट महायुती सरकारने दिलेले आरक्षण घालविले, याचे प्रायश्चित्त त्यांनी करावे. संजय राऊतांनी महायुती सरकारला सल्ले देण्यापेक्षा मराठा आरक्षण का घालविले म्हणून उद्धव ठाकरे यांच्याकडेच प्रश्न विचारला पाहिजे, अशी खोचक टीका ना. विखे पाटील यांनी केली.

आ. खताळ यांच्यावर संगमनेरात...

तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासह पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला होता. या हल्ल्यामुळे वातावरण तणावपूर्ण बनले होते. या घटनेचा सर्व स्तरांतून निषेध व्यक्त होत आहे. हल्ला करणार्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केली आहे. तर आमदार खताळ यांनी कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. पोलिसांनी हल्ला करणाऱ्यास ताब्यात घेतले असून पुढील कारवाई करत आहे.

संगमनेर शहरात आमदार अमोल खताळ यांच्याबाबत घडलेली घटना अत्यंत चुकीची आहे. आम्ही या घटनेचा जाहीर निषेध करतो. पोलिसांनी नि:पक्षपणे या घटनेची चौकशी करावी व सत्य आणि वस्तुस्थिती स्पष्ट करणारे निवेदन पोलिसांमार्फतच प्रसारित करण्यात यावे.

–अजय फटांगरे (तालुकाध्यक्ष, संगमनेर तालुका काँग्रेस)

ना. विखे यांच्याकडून तीव्र निषेध

तसेच आमदार खताळ यांच्याशी संपर्क साधून त्यांची चौकशी केली आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनाही त्यांनी हल्लेखोराच्या तपासाचे आदेश दिले. ज्यांना लोकशाही मान्य होत नाही त्यांना ठोकशाहीच मान्य असते. असे हल्ले करून महायुतीच्या कार्यकर्त्याचा आत्मविश्वास कमी करण्याचा कोणी कितीही प्रयत्न करीत असेल तर त्यांना त्यामध्ये यश येणार नाही. महायुतीचे कार्यकर्ते त्याच पध्दतीने उत्तर देतील असेही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

राजकीय पकड कायम...

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका व मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणातील दोन दिग्गज पवार नगर जिल्ह्यात येत आहेत. उपमुख्यमंत्री अजितदादा आज शुक्रवारी (दि. २९) श्रीगोंद्याला तर उद्या शनिवारी (दि. ३०) मोठे पवार म्हणजे खा. शरद पवार नगर शहरात येत आहेत. दोन्ही पवारांच्या कार्यक्रमातील राजकीय भाष्याची उत्सुकता आहे. उपमुख्यमंत्री अजितदादांच्या उपस्थितीमध्ये आज श्रीगोंद्यात शेतकरी मेळावा होणार आहे. माजी आ. बबनराव पाचपुते व त्यांचे चिरंजीव आ. विक्रमसिंह पाचपुते यांचे श्रीगोंदे तालुक्यातील बहुतांश विरोधक एकत्र आले आहेत व त्यांनी अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. त्यांना ताकद देण्यासाठी अजितदादा श्रीगोंद्याला येत असल्याचे सांगण्यात आले. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीपूर्वी श्रीगोंद्यात उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळाव्यात होणार आहे. मागील काही दिवसापूर्वी घनःश्याम शेलार, नागवडे कारखाना अध्यक्ष राजेंद्र नागवडे, अण्णासाहेब शेलार, बाळासाहेब नाहाटा, दत्तात्रय पानसरे, तालुकाध्यक्ष भगवानराव पाचपुते आदींसह माजी आमदार राहुल जगताप यांनी अजितदादा पवारांच्या उपस्थितीत होणाऱ्या शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा श्रीगोंद्यातील संत शेख महंमद महाराज मंदिर प्रांगणात होणार आहे. शेतकरी कर्जमाफी व्हावी, तसेच घोड, कुकडी पाण्याचा प्रश्न, तालुक्यातील रस्ते व वीज प्रश्न, सिस्पे गुंतवणूकदार याचे पैसे मिळण्यासाठी उपाययोजना आदींसह संत शेख महंमद महाराज देवस्थानची वक्फ बोर्डाकडे झालेली नोंद आदी विषयांवर या मेळाव्यात चर्चा अपेक्षित आहे. तालुक्याच्या प्रश्नांची मांडणी होणार असल्याने अजितदादा त्यावर काय बोलतात व आ. विक्रमसिंह पाचपुतेंवर काही टीका करतात का, हे पाहणे उत्सुकतेचे झाले आहे.

खा. पवार उद्या नगरमध्ये

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार शनिवारी (दि. ३०) नगरला येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत सकाळी सहकार सभागृहात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरुण कडू पाटील यांचा अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे. या सन्मान विचारांचा...कार्यक्रमास माजी मंत्री बाळासाहेब थोरात, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खा. निलेश लंके, माजी खासदार यशवंतराव गडाख, पद्मश्री पोपटराव पवार व या समारंभाचे निमंत्रक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा कार्यकर्ता मेळावा शनिवारीच दुपारी १.३० वाजता राष्ट्रवादी भवनमध्ये प्रदेशाध्यक्ष शिंदे यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी सांगितले. या मेळाव्यासाठी जिल्हा प्रभारी अशोकपवार, खा. निलेश लंके, प्रसाद तनपुरे, आ. रोहित पवार, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, जिल्हा निरीक्षक अंकुश काकडे, माजी आमदार दादा कळमकर उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधान मोदींची राजकारणातून...

आपल्या शतकोत्सवाकडे वाटचाल करत असलेल्या रा. स्व. संघाबद्दल बोलताना ते म्हणाले, संघ आम्हाला जे काही सांगेल, ते आम्ही करू. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांनी भाजपच्या 'नियम'चा मुद्दा वारंवार उचलून धरला आहे. अमित शहा यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ७५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या उमेदवारांना तिकीट न देण्याचा निर्णय घेतला होता, यावरून ही चर्चा सुरू झाली. मात्र, नंतर अमित शहांनी स्पष्ट केले होते की, हा एक निवडणुकीच्या दृष्टीने घेतलेला निर्णय होता आणि भाजपच्या संविधानात वयाबाबत कोणताही नियम नाही.

भाजपने देखील वारंवार स्पष्ट केले आहे की, मोदींना ७५ वर्षांनंतर पदावरून पायउतार होण्यासाठी कोणताही नियम नाही. पक्षाने केंद्रीय सरकारमधील एका सदस्याचे उदाहरण दिले आहे. मायक्रो, स्मॉल, अँड मीडियम एंटरप्रायजेस मंत्री आणि बिहारचे नेते जीतन राम मांझी यांचे वय ८० वर्षे असून ते या 'मर्यादे'च्या वर आहेत. पंतप्रधान मोदींसह इतर काही नेतेही या वयाजवळ आहेत. गेल्या वर्षी मे महिन्यात केंद्रीय निवडणुकांपूर्वी विरोधकांनी मोदी ७५ वर्षांनंतर निवडणूक लढवू शकणार नाहीत अशी टीका केली होती. त्यावेळी गृहमंत्री अमित शहांनी ही चर्चा खोडून काढली होती. त्यांनी सांगितले होते की, १७ सप्टेंबर रोजी वाढदिवसानंतरही पंतप्रधान राजकारणातून निवृत्त होणार नाहीत.

झेडपीच्या जामखेड तालुक्यातील...

जिल्हा परिषदेच्या निवडणुक होऊ घातल्या असून यामध्ये सत्ताधारी पक्ष आपल्या सोयीची गट रचना करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यानुसार जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गटांची रचना करतानाही हाच फंडा अवलंबण्यात येत होता, परंतु तत्कालीन तहसीलदार हे नियमावर बोट ठेवून काम करत असल्याने त्यांनी नियमाला बगल देऊन सोयीच्या गटरचनेला नकार दिला. त्यामुळे त्यांची थेट गडचिरोली येथे नुकतीच बदली केली गेली. त्यानंतर या गटरचनेकडे राजकीय वर्तुळासह जामखेड तालुक्याचे लक्ष लागले होते. गटरचना करताना नियमावर बोट ठेवून काम करणाऱ्या तहसीलदारांचा अडसर दूर केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत हवी तशी गटरचना नाशिक विभागीय आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आली. विभागीय आयुक्तांनी या हरकती व सूचना मागवून त्यावर सुनावणी घेणे त्यानंतर निकाल देणे, तो प्रसिद्ध करणे आणि नंतर संबंधित गटरचनेला मान्यता देणे आवश्यक होते. परंतु दबावाखाली काम करणाऱ्या विभागीय आयुक्तांनी केवळ निकाल देऊन तो प्रसिद्ध करण्यापूर्वीच सत्ताधाऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सोयीच्या गटरचनेला मान्यता दिली.

विभागीय आयुक्तांच्या या एकतर्फी काम करण्याच्या प्रकारने व्यथित होऊन मतदारसंघातील काही नागरिक मतदारांकडून या गटरचनेला औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले. या याचिकेवर सुनावणी झाली असता गटरचना करताना प्रक्रिया योग्यरीतीने न पार पाडता दबावाखाली काम करणाऱ्या विभागीय आयुक्तांची उच्च न्यायालयाने चांगलीच कानउघाडणी केली आणि आता यात संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसह इतर सर्व प्रतिवादींनाही उलट टपाली उत्तर मागवण्यासाठी नोटीसा काढल्या आहेत. या प्रकरणाच्या पुढील सुनावणीकडे आता पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष लागले आहे.

ज्या–ज्या वेळी अन्याय झाला त्या प्रत्येक वेळी न्यायालयाने न्याय देण्याचे काम केले आहे. आताही न्यायालयाच्या कठोर भूमिकेमुळे तरी प्रशासनाकडून सत्ताधाऱ्यांना सोयीची नाही तर नैसर्गिक हद्दी आणि भौगोलिक परिस्थिती जसे की रस्ते, डोंगर, नदी, नाले, वाड्या वस्त्यांची संलग्नता, दळणवळणाची सोय या बाबी आणि कायदेशीर दृष्टिकोन विचारात घेऊनच जनतेच्यादृष्टीने सोयीची गटरचना होईल, अशी अपेक्षा आहे.

– संतोष पवार, हरिभाऊ कुमटकर, बबन तुपेरे, याचिकाकर्ते

७० लाखांच्या ड्रोन उड्डाणामुळे...

या योजनेतील लकी ड्रा सोडती गुरूवारी लॉटरीपध्दतीने काढण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद प्रशासनाने अभिनव उपक्रमाच्या नावाखाली केलेल्या ७० लाखांच्या ड्रोनउड्डाणामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार की तोटा हे येणाऱ्या काळात समोर येणार आहे.

दरवर्षी जिल्हा परिषद कृषी विभाग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान अथवा जास्तीजास्त ९ हजार रुपयांचे अनुदान देत कडबाकुट्टी योजना राबवते. गेल्या अनेक वर्षापासून जिल्ह्यात कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप वाढलेले आणि मागणी वाढत असतांना यंदा कृषी विभागाने या योजनेतील दरवर्षीची ३० लाख रुपयांची तरतुदीतून अवघ्या ५ लाखापर्यंत खाली आणत या योजनेतील २५ लाखांचा निधी नवीन ड्रोन योजनेकडे वळला आहे. या ड्रोन योजनेत प्रत्येक तालुक्यात लॉटरी पध्दतीने शेतकरी उत्पादक कंपनीला १० लाखांपर्यंतचा ड्रोनचा एक सेट पूरवणार आहे. या निधीतून शेकडो कबडाकुट्टी यंत्रे देता येत असतांना केवळ अभिनव योजनेच्या नावाखाली अधिकाऱ्यांनी कडबाकुट्टी योजनेला बगल दिल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू झाली आहे.

यंदा जिल्ह्यातील अवघ्या ५५ शेतकऱ्यांना कडबाकुट्टी योजनेत ५० टक्के अनुदान देता येणार आहे. नगर जिल्ह्यात दुग्धव्यवसाय मोठा असून सामान्य शेतकऱ्यांसाठी ड्रोनपेक्षाही कडबाकुट्टी ही महत्वाची योजना असतांनाही जिल्हा परिष प्रशासनाने स्वत: च्या पाठ थोपटून घेण्यासाठी ड्रोन योजना राबवण्याचा निर्णय घेतला. तसेच जर ही योजना जिल्हा परिषदेला महत्वाची होती, तर कडबाकुट्टी योजनेची तरतूद कशासाठी कमी केली असा संतप्त सवाल कडबाकुट्टी यंत्र प्रेमी शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

दरम्यान, यापूर्वी जिल्हा परिषद कृषी विभाग मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम येणाऱ्यांना, प्रथम प्राधान्य देत ही योजना राबवत होते. मात्र, अशा प्रकारे प्राधान्यक्रम ठरवतांना शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याने यंदापासून कृषी विभागाने लॉटरी पध्दतीने कडबाकुट्टी, शेतकऱ्यांसाठी स्लरी फिल्टर आणि ड्रोन योजना राबवण्याच्या निर्णय घेतला आहे. तीन वर्षापूर्वी जिल्हा परिषदेत नव्याने बदलून आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांना देखील कडबाकुट्टीचे योजनेचे महत्व लक्षात आल्या त्यांनी योजनेतील घटवलेली तरतूद पूर्वत केले होती. मात्र, यंदा सर्व परिस्थिती माहित असतांना जिल्हा परिषद प्रशासनाने कडबाकुट्टी योजनेकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

प्रत्येक तालुक्याला अवघे चार कुट्टी यंत्रे

जिल्हा परिषद कृषी विभागाच्यावतीने दरवर्षी १० ते १५ कडबाकुट्टी यंत्र देण्यात असल्याने यंदा देखील आपल्याला कडबाकुट्टी यंत्रे मिळणार या आशावर असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला यंदा प्रशासनाने पाने पुसली असून यंदा पाच लाख रुपयांतून शेतकऱ्यांना अवघ्या ५५ यंत्रासाठी जिल्हा परिषद अनुदान देणार आहे. यामुळे प्रत्येक तालुक्यातून चार तर जामखेड तालुक्यातून यंदा अवघ्या तिघांना कडबाकुट्टीचे अनुदान मिळणार आहे.

राहुरीत ६ कोटी ३३ लाखांची...

दरम्यान, यासंदर्भात अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसून वस्तु आणि कर सेवा विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाला माहिती देण्यात आली असून त्यांच्यासह पोलिसांकडून चौकशी सुरू असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

अधीक्षक घार्गे यांच्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई बुधवारी (२७ ऑगस्ट) रात्री केली. याबाबतची माहिती अधीक्षक घार्गे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी निरीक्षक कबाडी उपस्थित होते.

अधीक्षक घार्गे यांनी सांगितले, बुधवारी राहुरी तालुक्यातील चिंचोली शिवार, हॉटेल महालक्ष्मी, चौधरी पॅलेस परिसरात माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला. तेथे आलेले १३ ट्रक तपासण्यात आले असता, ट्रक चालकांकडे वाहतूक परवाना किंवा ई–वे बिल आढळून आले नाही. त्यांच्या ताब्यातील बिले ही संगणीकृत नसून हस्तलिखित व बनावट असल्याचे निदर्शनास आले. बिलांमध्ये माल दिल्लीला पोचविण्याचे नमूद केले होते. कारवाईत एकूण १३ ट्रक आढळून आले. यापैकी १० ट्रक चालकांना ताब्यात घेण्यात आले व नंतर नोटीस देऊन सोडून देण्यात आले. उर्वरित ३ ट्रक चालक पसार झाले आहेत. ताब्यात घेतलेल्या वाहनांमध्ये सडलेली लाल सुपारी व तंबाखू आढळली. चौकशीत चालकांनी हा माल कर्नाटक येथील मोहंमद अक्रम यांचा असल्याचे सांगितले. सदर सुपारी व तंबाखू गुजरातमध्ये गुटखा बनविण्यासाठी नेत असल्याचे त्यांनी कबूल केले. पोलिसांनी ६ कोटी १७ लाख ८५ हजार रूपये किमंतीची २ लाख ५ हजार ९५० किलो सुपारी, १५ लाख ६० हजार रूपये किमतीची ७ हजार ८०० किलो तंबाखु व २ कोटी १० लाखाच्याा १३ ट्रक असा तब्बल ८ कोटी ४३ लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश गांगर्डे, गणेश लबडे, राहुल व्दारके, लक्ष्मण खोकले, भिमराज खर्से, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, सतिष भवर, सुनिल मालणकर, महादेव भांड, उमाकांत गावडे यांच्या पथकाने केली.

बनावट बिले उघड

ट्रक चालकांकडे वाहतूक परवाना किंवा ई–वे बिल आढळून आले नाही. त्यांच्या ताब्यातील बिले ही संगणीकृत नसून हस्तलिखित व बनावट असल्याचे निदर्शनास आले. जप्त केलेल्या मालाबाबत व करचुकवेगिरी प्रकरणी राज्य कर सह आयुक्त, वस्तु व कर सेवा विभाग, अहिल्यानगर तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग, अहिल्यानगर यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून पुढील कारवाई त्यांचेमार्फत सुरू आहे. पोलिसही आपल्या पातळीवर चौकशी करत आहे. चौकशीअंती पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.